विक्रीकर आयुक्तांचे कार्यालय,
ई विंग, ८ वा मजला, विक्रीकर भवन,
माझगांव, मुंबई – ४०००१०.

परिपत्रक

प्रति,

......................................
......................................
......................................

क्रमांक-विउआ/प्रशा-२९/२०११/ब- मुंबई,दिनांक 03/08/2011
परिपत्रक क्र. 12T

विषय–महाराष्ट्र राज्यातील माथाडी तोलणार, हमाल यांना व्यवसाय करातून सूट देण्यासंदर्भात.

महाराष्ट्र राज्यातील माथाडी मंडळे व माथाडी हमाल तोलणार यांच्यात मालक कामगार संबंध नाही. माथाडी मंडळ हे माथाडी हमालाच्या कल्याणासाठी स्थापन केलेले मंडळ आहे. या माथाडी मंडळात मालक, हमाल व सरकार नियुक्त प्रतिनिधी असतात. ही माथाडी मंडळे हमालाच्या कामाबद्दल मालकांकडून (व्यापा-याकडून) मजूरी व काही टक्केवारी प्रमाणे सेस वसूल करतात. मजूरी जशीच्या तशी हमालात वाटली जाते. तर सेसच्या रकमेतून हमालांच्या कल्याणासाठी योजना राबविल्या जातात.

प्रत्येक वेळी काम करणारे हमाल वेगवेगळे असून कामाचे स्वरूपही हंगामी स्वरूपाचे असते. माथाडी मंडळ हे मालक नसल्यामुळे व माथाडी हमाल, तोलणार हे त्यांचे कामगार नसल्यामुळे व त्यांच्यात मालक नोकर संबंध नसल्यामुळे त्यांना महाराष्ट्र व्यवसायकर कायदयाअंतर्गत नावनोंदणी व नोंदणी दाखला घेण्यासंबंधी तरतूदी लागू होत नाहीत. तसेच महाराष्ट्र व्यवसायकर कायदा १९७५ च्या कलम २ (ई) मधील "व्यक्ती" या संज्ञेमध्ये माथाडी कामगाराचा समावेश होत नाही. म्हणून त्यांना महाराष्ट्र व्यवसायकर कायदयाअंतर्गत नावनोंदणी व नोंदणी दाखला घेण्यासंबंधी तरतूदी लागू होत नाहीत.

महाराष्ट्र व्यवसायकर कायदा १९७५ च्या कलम २ (ई) मधील तरतुद कलम "Persons" means any person who is engaged (actively or otherwise) in any profession, trade calling or employment in the State of Maharashtra, and includes a Hindu Undivided Family firm company corporation or other Corporate body, any society, club or association, so engaged but does not include any person who earns wages on a casual basis.

वरील सर्व बाबींचा विचार करता माथाडी मंडळ व माथाडी हमाल व तोलणार हे व्यवसायकराच्या PTRC व PTEC या तरतूदीच्या कार्यकक्षेत येत नसल्यामुळे त्याना व्यवसायकर लागू होत नाही.

(संजय भाटीया)
विक्रीकर आयुक्त
महाराष्ट्र शासन, मुंबई.

क्रमांक-विउआ/प्रशा-२९/२०११/ब- ______________ मुंबई,दिनांक
परिपत्रक क्र.

प्रत-
१) सर्व अपर विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) सर्व विक्रीकर सहआयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) सर्व वरिष्ठ विक्रीकर उपआयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) सर्व विक्रीकर उपआयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) सर्व सहायक विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) सर्व विक्रीकर अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहितीस्तव सादर-
१) मा. उपसचिव, अर्थ विभाग, मंत्रालय, मुंबई.
२)मा. अवर सचिव, अर्थ विभाग, मंत्रालय, मुंबई.
३)मा. लेखा अधिकारी, लेखा परिक्षण, मुंबई आणि नागपूर.

प्रत माहितीस्तव -
सर्व कक्ष अधिकारी आणि विक्रीकर आयुक्त.
कार्यालयातील सर्व अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

(पराग महाजन)
विक्रीकर उपआयुक्त (प्रशा-२९)
व्यकर, महाराष्ट्र राज्य, मुंबई.